# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक : १०६/२०२१

**Ph. D. Admission Process 2021**

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठीच्या मुदतवाढीबाबत.....**

पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथे प्रवेश प्रक्रिया सुरू करावयाची असून याकरिता मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडून रिक्त जागांची माहिती दि. १५/०४/२०२१ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेली होती. तथापी, काही मार्गदर्शकांनी रिक्त जागांची माहिती अद्ययावत केलेली नाही.

यासंदर्भात पुनश्च: कळविण्यात येते की, मार्गदर्शकांनी परिपत्रक क्र. ९७/२०२१ दि. ०१/०४/२०२१ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार Declare Ph.D. Vacancy 2021 या लिंकवर आपल्याकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती स्व:ताच्या Teacher Login वरून ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या **www.unipune.ac.in** या संकेतस्थळावरून **http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx** या लिंकव्दारे **दि. २६/०४/२०२१** पर्यंत आपल्या संशोधन केंद्रामार्फत सादर करावी.

ज्या मार्गदर्शकांना शैक्षणिक वर्ष २०२१ मध्ये विद्यार्थी घ्यावयाचे नसतील त्यांनीही आपल्याकडे नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती सादर करणे आवश्यक आहे. दि. २६/०४/२०२१ नंतर रिक्त जागा अद्ययावत करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :—

- ई–मेल आयडी :— phd.mphiladmis@pun.unipune.ac.in
- दुरध्वनी क्र. :— ०२० —२५६२१२२७
- **माहिती अद्ययावत करण्यासाठीची लिंक** :— http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx

16/04/2021

उत्तम रा. चव्हाण
**उपकुलसचिव**
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/१८८४
दिनांक : १५/०४/२०२१

प्रत :—

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.